महाराष्ट्र शासन

# छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा

**Chhatrapati Sambhaji Maharaj Government Medical College and Hospital Satara,**
**467, Sadar bazar, Camp, Satara 415001**

**Phone No 02162-299763** **Email id :- deangmcsatara7@gmail.com**

जा.क्र. छसंमशावैमवरुसा/ औषधभांडार/ दरपत्रक मागणी / 350 /2024 दि. 23 /09/2024

## जाहीर सूचना

विषय- औषधे व उपभोग्य वस्तूंच्या पुरवठ्यासाठी दरपत्रके मागाविण्याबाबत.

छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा येथे आवशक असलेल्या Annexure B मधील औषधे व औषधी साहित्य यांच्या पुरवठ्यासाठी इच्छुक अधिकृत पुरवठादारांकडून सीलबंद लिफाफ्यात दरपत्रके मागवण्यात येत आहेत. **सदर दरपत्रके दिनांक ३०.०९.२०२४, दुपारी १२:०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा रीतीने पाठवण्यात यावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रकांचे लखोटे शक्यतो त्याच दिवशी सायंकाळी ४:०० वाजता उघडले जातील. सर्वसाधारण नियम,अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

१) इच्छुक पुरवठादारांनी नियम,अटी व शर्तींच्या अधिन राहून **स्वतंत्र दरपत्रके** सादर करावीत.

२) सदरचे दर हे, शासनाकडून पुरवठा न होऊ शकणाऱ्या बाबींसाठी व तेवढ्याच कालावधीतील तातडीच्या खरेदीसाठी मागवण्यात आले आहेत. **यादीमधील नमूद बाबी व त्यांच्या समोर नोंदवलेली अंदाजित संख्या यांची खरेदी करणे या कार्यालयास बंधनकारक नाही. आवशकतेनुसार व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार सदर यादीतील बाबींची खरेदी संख्या कमी /अधिक किंवा निरंक होऊ शकते.**

३) दरपत्रके अधिष्ठाता, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा यांचे नावाने पाठवावीत.

४) दरपत्रकात नमूद केलेले दर प्रति युनिट प्रमाणे असावेत आणि ते दर किमान सहा महिने कालावधीकरीता वैध असावेत. हे सर्व दर कर व वाहतूक खर्चासह असावेत. तसेच मालाचा पुरवठा छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा येथे दारपोच करावा लागेल , व त्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क या कार्यालयाकडून दिले जाणार नाही, हयाची नोंद घ्यावी.

५) प्रत्येक दरपत्रक स्वतंत्र बंद लिफाफ्यात पाठवावे. दर मागणी पत्राचा संदर्भ क्रमांक प्रत्येक लिफाफ्यावर आणि दरपत्रकावर स्पष्ट लिहिलेला असावा.

६) दरपत्रके पुरवठादाराच्या लेटर हेड वरच सादर करावीत. लेटर हेड वर आपल्या संस्थेचा शिक्का व स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.

६) दरपत्रक प्रक्रिये अंती यशस्वी पुरवठादारांना खरेदी आदेश ई-मेल द्वारेच पाठवले जातील, त्यासाठी प्रत्येक पुरवठादाराने दरपत्रकामध्ये स्वतःच्या फर्मचा ई-मेल अड्रेस नमूद करणे बंधनकारक आहे.

७) खरेदी आदेश ई-मेल द्वारे पाठवलेल्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत मालाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे.

८) खरेदी आदेशानुसार औषधे/वस्तूंचा पुरवठा ०७ दिवसांत न झाल्यास रुग्णालयाच्या तातडीच्या गरजेनुसार खुल्या बाजारातून सदरची खरेदी करण्यात येईल. तसेच झालेल्या अतिरिक्त खर्चाची वसुली संबंधित पुरवठादाराच्या अन्य देयकांच्या देय रकमेमधून वसुल केली जाईल. अन्य देय देयक नसल्यास शासनाच्या प्रचलित नियमानुसार वसुली केली जाईल. तसेच सदरच्या पुरवठादारास या कार्यालयाकडून होणाऱ्या पुढील कालावधीतील खरेदीप्रक्रियेत सहभाग घेण्यास ३ वर्षासाठी प्रतिबंधित केले जाऊ शकते.

०९) दरपत्रके उघडतेवेळी इच्छुक पुरवठादार उपस्थित राहू शकतात.

१०) दरपत्रकांमध्ये नोंदलेल्या दरांमध्ये खाडाखोड केली असल्यास सदर दरपत्रक अवैध घोषित केले जाईल.

११) सदरचे दर बाजारभावापेक्षा अधिकचे नसावेत.

१२) पुरवठादराने कोणत्याही अटी ,शर्ती दरपत्रकामध्ये नमूद केल्यास सदर दरपत्रक अस्वीकृत केले जाईल.

१३) दरपत्रकासोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे.

I) परिपूर्ण भरलेले Annexure A (१०० रु च्या Stamp Paper वर)

II) अन्न व औषध प्रशासन विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र साक्षांकित प्रत (attested copy Drug License certificate)

III) जी एसटी नोंदणी प्रमाणपत्र साक्षांकित प्रत (attested copy of GST registration certificate)

IV) attested copies of shop act license, PAN card, Aadhar card .

१४) दरपत्रक प्रक्रिया,सदर प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर अंशतः अगर पूर्ण स्थगित करणे वा रद्द करण्याचे पूर्ण अधिकार, अधिष्ठाता, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा हे राखून ठेवत आहेत.

१५) न्यायालयीन अधिकार क्षेत्र- सातारा शहर फक्त.

अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा

अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.

## Annexure A

हमीपत्र (१०० रु.च्या स्टंप पेपर वर)

प्रमाणित करण्यात येते कि,

1) माझी फर्म.................. (फर्मचे नाव) चा समावेश कोणत्याही शासकीय / निमशासकीय कार्यालयाने काळ्या यादीत केलेला नाही.

2) मी................किंवा माझी फर्म.............. (फर्मचे नाव) या मधील कर्मचारी यांचे खरेदी प्रधीकाऱ्यासोबत कोणतेही हितसंबंध नाहीत. तसेच सादर केलेले दरपत्रक हे एकल असून दुसऱ्या कोणाशीही संगनमताने अथवा साखळी करून सादर केलेले नाही. असे आढळून आल्यास दंडात्मक कारवाईस पात्र राहीन.

3) मी............... अधिष्ठाता छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा यांनी सदर दरप्रक्रियेत नमूद केलेले सर्व नियम,अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. मला याची पूर्ण जाणीव आहे कि, मी सदर पैकी कोणत्याही नियम, अटी वा शर्तीचे पालन केले नाही तर दंडात्मक व प्रतिबंधात्मक कारवाईस पात्र राहीन.

दिनांक:

ठिकाण:

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी

संपूर्ण नाव व शिक्का

# Annexure B

## List of Items

| Sr. No | Name of medicine | Required approximate qty. | Unit for rate | Rate to be quoted per unit, by supplier in rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Inj. Human Albumin Inj 20%, 100ml | 200 | 1 nos. | |
| 2 | Low molecular weight heparin 40 IU (Enoxaparin) | 2000 | 1 nos. | |
| 3 | Sodium Chloride - Normal Saline 0.9% Inj. I.V. 100 ml | 3000 | 1 nos. | |
| 4 | Sodium bicarbonate Inj. I.V. 7.5 mg/ml, 10ml | 2000 | 1 nos. | |
| 5 | Inj. Mag. Sulphate 50% 2ml | 5000 | 1 nos. | |
| 6 | Dextrose Inj I.V. 25%, 100ml | 2000 | 1 nos. | |
| 7 | Inj. Paracetamol IV1gm/100ml | 1000 | 1 nos. | |
| 8 | Inj. Etophyllin 231mg+ Theophyillin 69 mg | 3000 | 1 nos. | |
| 9 | Tab. Etophyllin 231mg+ Theophyillin 69 mg SR | 25000 | 1 nos. | |
| 10 | Tab.Glimiperide 2 mg | 100000 | 1 nos. | |
| 11 | Tab Levetiracetam 250 mg | 25000 | 1 nos. | |
| 12 | Clotrimazole 100 mg vaginal Pessaries with applicator | 2000 | 1 nos. | |
| 13 | Tab Quetiapine 50 mg | 15000 | 1 nos. | |
| 14 | Syrup Cetrizine 30 ml | 1500 | 1 nos. | |
| 15 | Saline Nasal Drop 10 ml | 2000 | 1 nos. | |
| 16 | Topical Lignocaine jelly 2% 30 gm | 1000 | 1 nos. | |
| 17 | Paradichlorobenzene 2% +Chlorbutanol 5%+Benzocaine 2.7%+Turpentine Oil 15% ear Drops 10ml | 2000 | 1 nos. | |
| 18 | Tab Prednisolone 5 mg | 10000 | 1 nos. | |
| 19 | Formaldehyde Solution 500 ml 40% Stabilize with methyl alcohol | 300 | 1 nos. | |
| 20 | Ethamsylate Inj. 125 mg/ml, 2ml | 1500 | 1 nos. | |
| 21 | Endotracheal Tube with Cuff no.7.5 | 500 | 1 nos. | |
| 22 | Endotracheal Tube with Cuff no.8 | 500 | 1 nos. | |
| 23 | Infant feeding tube no. 4,5,6 | 1500 (each) | 1 nos. | |
| 24 | Abdominal Drain Kit No, 28,32 | 250 (each) | 1 nos. | |
| 25 | I.V. Cannula 24G | 7000 | 1 nos. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 26 | IV. Set Adult | 20000 | 1 nos. | |
| 27 | Tab.Ciprofloxacin 500mg | 100000 | 1 nos. | |
| 28 | Oint.Betamethasone Dipropionate 0.025% W/W | 10000 | 1 nos. | |
| 29 | Oint. Clobetasol 30gm 0.05% W/W | 10000 | 1 nos. | |
| 30 | Inj. Diclofenac 25 mg/ml ,3ml | 5000 | 1 nos. | |
| 31 | Syr. Amoxycilline 60 ml, 125mg/5ml | 3000 | 1 nos. | |
| 32 | Inj. Lignocaine 2% with adrenaline 1:200000 IU 30 ml vial | 300 | 1 nos. | |
| 33 | Surg. Sterile rubber gloves no.7 | 15000 | 1 nos. | |
| 34 | Ciprofloxacin eye /ear drop 0.3% W/V 5ml | 4000 | 1 nos. | |
| 35 | Chromic catgut size no.1/.0 length 76cm (box of 12 foil) | 200 box | 1 nos. | |
| 36 | Rolled cotton Bandage 10cm*4 mtr roll | 10000 | 1 nos. | |
| 37 | Liquid paraffin Bottle 500ml | 500 | 1 nos. | |

अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा

अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.

प्रत-
नोटीस बोर्ड,
छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा .